विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर,( स्वायत्त )

समाजशास्त्र विभाग

(बी ए भाग २)

दिनांक २५/ १०/२०२२

समाजशास्त्र विभागातील बी ए भाग २- मधील सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की,दिनांक २६/१०/२०२२ रोजी रुम न २० सकाळीं १० वा.पेपर न ३"झोपडपट्टीच्या समस्या "या विषयावर ओपन बुक टेस्ट घेण्यात येईल तरी आपण सर्वांनी टेस्ट देणे अनिवार्य आहे.

प्रा. चामे एच. व्ही.

HEAD
DEPARTMENT OF SOCIOLOGY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

E: All Notice/Sr Art Com

10

Date
Page

कोमल नामदेव पाटील

class - B.A.2 Roll No - 4985

subject - Sociology.

लोकसंख्या वाढीची कारणे -

प्रस्तावना - १९२१ पर्यंत भारतातील जन्मदर व मृत्यूदर यात फारशी तफावत नव्हती. त्यामुळे लोकसंख्याची वाढ विशेष जाणवत नव्हता. पण १९२१ पासून निव्वळ लोकसंख्यातील भर लक्षणीय प्रमाणात वाढतच गेली. याचे कारण म्हणजे मृत्यूदरात वेगाने घट होत गेली व जन्मदर वेगाने वाढत चालला.

व्याख्या -

लोकसंख्या म्हणजे एखाद्या भौगोलिक प्रदेशात राहणाऱ्या व्यक्तीची लोकसंख्या होय.

अ] घटता मृत्यूदर (मृत्यूदर घटविणारे घटक)

मान्सून पावसाच्या मर्जीवर अवलंबून असलेल्या भारतीय शेती प्रधान अर्थव्यवस्थेला सातत्याने ओल्या किंवा कोरड्या दुष्काळास तोंड द्यावे लागत असे. अशा दुष्काळात हजारो माणसे अन्नपाण्या-अभावी मृत्यूमुखी पडत होती. या गोष्टी इतक्या नित्यनेमाच्या होत्या की त्याला 'मरी आईचा फेरा' म्हटले जात असे. पण पुढे विज्ञानच्या वाढत्या प्रमाणबरोबर शेतीक्षेत्रात सुधारणा झाली, उत्पादन व्यवस्थेच्या कार्यक्षमतेत वाढ झाली व एकूण शेती उत्पादन वाढू लागले वाहतुकीच्या सोई व दळणवळण साधनांच्यामध्ये वाढ झाली. दुष्काळ ग्रस्त भागात तातडीने अन्नधान्याच्या, औषधांच्या व इतर मदतीचा पुरवठा करता येऊ लागला.

2) विविध साथी व इतर रोगांवर प्रभावी नियंत्रण -

पूर्वी भारतात देवी, प्लेग, कॉलरा, एन्फ्यूएंझा यांसारख्या रोगांच्या साथी मोठ्या प्रमाणात येत व त्यात गावेच्या गावे ओसाड होत. १९११ ते २१ च्या दरम्यान निव्वळ प्लेगच्या साथीने ३० लाखांचा बळी घेतला होता. तर १९१८ च्या एन्फ्यूएंझाच्या साथीने मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या १९२० ते १.३० कोटींच्या घरात होती. पण

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD 1964 (Autonomous)

१९२१ नंतर यात प्रभावी औषधोपचार व रोगप्रतिबंध लसींचा वापर करण्यात येऊ लागला.

३) आरोग्यविषयक सोई- सुविधात वाढ -
ब्रिटिशांच्या राजवटीत सार्वजनिक आरोग्य राखण्यावर जाणिवपूर्वक भर देण्यात आला तर स्वातंत्र्योत्तर काळात शासन व लोक अत्यंत दक्ष राहू लागले. डॉक्टर्स, परिचारिका, दवाखाने यांचे खाजगी व सरकारी पातळीवर संपूर्ण भारतभर जाळे विणले गेले. सोई सुविधा केवळ शहरापुरत्या मर्यादित न ठेवता ग्रामीण भागात देखील नेल्या आहे.

४) सरकारी आयुर्मानात वाढ -
स्वातंत्र्योतर काळात शेती व्यवसायात आधुनिक तंत्रांचे वापर करून शेती उत्पादनात वाढ झाली. जीवनसत्व युक्त भाजीपाल्यांचा पुरवठा तसेच वैयक्तिक व कौटुंबिक आरोग्याची काळजी घेण्याबाबत प्राप्त झालेला. भारतीय व्यक्तींच्या सरसरी आयुर्मानात वाढ झाली आहे; ही गोष्ट निश्चितच स्वागतार्ह आहे तशीच ती लोकसंख्येत वाढीस पोषक ठरली आहे.

५) विवाहाची सार्वत्रिक प्रथा -
भारतात लग्न हा धार्मिक विधी मानला जातो. त्यामुळे लग्न करण्याच्या वयात भारतातील सर्व स्त्री - पुरुष विवाह करतात सार्वत्रिक विवाहाच्या च्या प्रथे मुळे भारतातील लोकसंख्या जलद गतीने वाढते. पर्यायाने नवीन जन्माला येणाऱ्या बालकांचे प्रमाण वाढते.

६) दारिद्र्य -
भारतीय लोकांचे दारिद्र्य हे ही भारतातील लोकसंख्या वाढीचे कारण झाले आहे. भारतीय लोकांच्या गरीब परिस्थिती मुळे घरात अधिकाधिक मुलांचा जन्म झाला. जेवढी अधिक मुले होतील तेवढी ती शेती साठी किंवा इतरत्र काम धंदा करून पैसे मिळवतील. म्हातारपणी भाकरीला आधार मिळावा म्हणून अधिक मुलांना जन्माला घातले जाते. पर्यायाने लोकसंख्यात वाढ होते.

७) अशिक्षित व अज्ञानी जनता -

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

भारतात पितृ प्रधान समाज व्यवस्था असल्याने मुलगा जन्माला आला तरच आपल्या घराण्याचे नाव व परंपरा चालू राहील असे मानले आहे. भारतात मुलगा होई पर्यंत संख्या वाढविली जाते. तसेच श्राद्ध हे मुलानेच केले पाहिजे, तर पितरांना सद्गती मिळते अशी समजूत असल्याने मुलगा होई पर्यंत अपत्यांची संख्या वाढत जाते व पर्यायाने लोक संख्या वाढते.

८) भारतात कुटुंबनियोजनाला विरोध -

सरकारने कुटुंबनियोजन मोहिम राबविली तरी भारतातील बहु संख्य समाज निरक्षर व अज्ञानी असल्या मुळे सरकारी पातळीवर राबविलेली ही मोहिम तितकीशी यशस्वी झाली नाही. कुटुंबे कुटुंबनियोजन कार्यक्रमा विषयी लोकांमध्ये निरुत्साह व उदासीनता असल्याने भारताची लोक संख्या वेगाने वाढते आहे.

९) वैद्यकीय सुविधांचा अभाव व अज्ञान -

वैद्यकीय सुविधा असून देखील त्या ग्रामीण भागामध्ये पोहोचत नाहीत. काही वेळेस कुटुंब नियोजनांच्या साधनांची माहिती असते. परंतु त्याची उपलब्धता नसल्या मुळे म्हणजेच या सुविधांचा अभाव असल्या मुळे तीचा वापर केला जात नाही. गैरसमजुती व अज्ञाना मुळे माहिती देवून देखील त्याचा वापर केला जात नाही. या कारणां मुळे लोकसंख्ये मध्ये वाढ होताना दिसून येते.

१०) एकत्र कुटुंब पद्धती -

एकत्र कुटुंब पद्धतीत घराचा खर्च एकत्रित रित्या चालत असतो. त्यामुळे आपल्याला किती ही मुले झाली तरी त्यांच्या पालन पोषणाची जबाबदारी ही कुटुंबाची सामुदायिक जबाबदारी मानली जाते. त्यामुळे कोणी ही आपले कुटुंब मर्यादित करण्याचा विचार करत नाही. भारतात अजूनही एकत्र कुटुंब पद्धतीचे अस्तित्व असल्याने फार मोठ्या प्रमाणात भारताची लोक संख्या वाढत आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

११) निरक्षरता -

आपल्या देशात निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. निरक्षरते मुळे अंधश्रद्धा वाढतात. अशी लोकसंख्या वाढली तर

Date
Page

अनेक अडचणीला तोंड द्यावे लागते. शिवाय शासनाला सुद्धा आरोग्य सुविधा व इतर सुविधा पुरविणे अवघड होते. तेव्हा ही लोकसंख्या वाढ थांबवण्यासाठी विविध स्तरावर अनेक प्रयत्न चालू आहेत. ग्रामीण तसेच शहरी भागातील स्त्री पुरुषा मध्ये जागृती निर्माण करणे गरजेचे आहे. लोकसंख्या वाढी मुळे अनेक अडचणी उभ्या राहतात त्या संबंधी जाणीव लोकां मध्ये निर्माण करायला हवी.

10

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

Vivekanand College Kolhapur -
(Autonomous)
Department of Sociology.
BA. IInd part. 2021-2022.
Attendence - List.

| Sr No. | Student Name | Signature |
| --- | --- | --- |
| 1). | Shivani Prabhakar Lokhande. | [illegible] |
| 2). | Samika. Bharat. Narsinge. | SBNarsinge |
| 3). | Komal Namdeo. patil. | K.N.P. |
| 4). | Satyjit. Prabhakar. Chugale. | SPC. |
| 5). | Snehal Namdeo Patil. | Snpatil |
| 6). | pranav - Pravin. Dalvi. | Dalvipp. |
| 7). | patil Vaibhavi. chandrakant. | [illegible] |
| 8). | patil. Vrashnavi. Prabhakar | VPatil |
| 9). | pingle. Aniket. Prabhakar | Pingalap |
| 10). | Rane. Tejesh. Pandit. | RP |
| 11) | yadav. Vaibhav. Krushnath. | [illegible] |
| 12). | Shaikh. Sahil. Riyaj. | Shaikh |

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Vivekanand college Kolhapur.
(Autonomous).
Department of Sociology.
BA-IInd. part - 2021-2022.
marks. list. open Book Test

| Sr.no. | Students Name. | Marks. |
| --- | --- | --- |
| 1) | Shivani- prabhakar. Lokhande. | 09 |
| 2) | sanika. Bharat. Narsingle. | 08 |
| 3) | Komal. Namdeo. patil. | 09 |
| 4) | satyjit. prabhakar. chougule. | 08 |
| 5) | senehal. Namdeo Dalvi | 07 |
| 6) | pranav- pravin. Dalvi | 06 |
| 7) | patil. Viabhavi chandrakant. | 08 |
| 8) | patil- Vishnavi Prabhakar | 08 |
| 9) | pingle Ankit. prabhakar. | 07 |
| 10) | Rane Tejesh. Pandit. | 07 |
| 11) | Yadav Vaibhav Krsanath. | 08 |
| 12) | Shikh. Sahil Riyaj. | 06 |

HOD.

Shri- H.V. Chavne.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964